॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

*** सुविचार ***
माणूस पैशाने नव्हे, तर विचारांनी आणि संस्कारांनी श्रीमंत असावा.


■ अहिल्यानगर ■ सोमवार, दि. २० जुलै २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ४५ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

# देशभरात पावसामुळे हाहाकार उडणार

## भारतीय हवामान विभागाकडून देखील देशभरात हाय अलर्ट

**● कोटा । वीरभूमी –**
इस्रोच्या इनसॅट-३ डीआर सॅटेलाईटने भारताच्या हवामानातील मोठा बदल समोर आणला आहे. यामुळे भारतीय हवामान विभागाकडून देखील देशभरात हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. देशाचा जवळपास दोन तृतियांश भाग हा ढगांनी व्यापून गेला आहे. जम्मू काश्मीरपासून ते गंगा नदीच्या मैदानी प्रदेशापर्यंतचा भाग ढगांनी व्यापून टाकला आहे. बिहार, पश्चिम बंगाल आणि पूर्वोत्तर राज्यांमध्ये मान्सूनच्या ढगांनी गर्दी केली आहे. मान्सून भारतामध्ये आता पूर्णपणे सक्रिय झाला आहे.

या पार्श्वभूमीवर अनेक राज्यांमध्ये अति मुसळधार पावसाचा इशारा भारतीय हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. काही राज्यात तर अतिवृष्टीची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाकडून सातत्याने या निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा घेतला जात आहे. इस्रोच्या सॅटेलाईटने जारी केलेल्या नव्या फोटोंमुळे मोठी खळबळ उडाली आहे. भारताचा जवळपास ६० ते ७० टक्के भाग मान्सूनच्या ढगांनी व्यापून टाकला आहे. याचाच अर्थ पुढील दोन ते तीन दिवसांमध्ये देशातील जवळपास दोन तृतियांश भागांमध्ये अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. पंजाब, उत्तर प्रदेश, बिहार या राज्यांमध्ये अतिवृष्टीची शक्यता आहे.



हवामान तज्ज्ञांच्या मते गेल्या काही वर्षांपासून वातावरणात मोठा बदल होत आहे. कधी-कधी अतिमुसळधार पाऊस होतो तर कधी-कधी दुष्काळासारखी परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे नागरिकांनी हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर हवामान विभागाकडून देण्यात येणाऱ्या सूचनांचं पालन करावे असे देखील नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे.

जून महिन्याच्या सुरुवातीला जोर धरलेल्या पावसाने गेल्या काही दिवसांपासून दांडी मारल्याने चिंतेत असलेल्या शेतक-यांना या पावसामुळे काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. अशातच पुढील पाच दिवसांसाठी हवामान विभागाने जोरदार पावसाचा नवा अंदाज वर्तवला आहे. १९ जुलै ते २३ जुलै दरम्यान राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. मुंबईसह कोकणात रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. तसेच पालघर, ठाणे आणि नवी मुंबई या भागांत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज आहे.

त्याचसोबत उत्तर महाराष्ट्रातील धुळे, नंदुरबार, जळगाव आणि नाशिक येथे जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. तर हवामान विभागाने या जिल्ह्यांमध्ये यलो अलर्ट जारी केला. तसेच पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यांत जोरदार पावसाची शक्यता नसून ढगाळ आणि दमट वातावरण कायम राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

### महाराष्ट्रात काय स्थिती?

■ महाराष्ट्रात पावसाने पुन्हा एकदा जोरदार पुनरागमन केले आहे. भारतीय हवामान विभागाकडून तब्बल २३ जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मध्य महाराष्ट्र, कोकण आणि मराठवाड्यामध्ये पावसाचा जोर वाढणार आहे. पुणे, नाशिक, परभणी, जालना, बीड, नांदेड, हिंगोली, सोलापूर, लातूर, अमरावती, गडचिरोली, धाराशिव, बुलढाणा, चंद्रपूर, नागपूर या जिल्ह्यांसह अनेक जिल्ह्यांना आज पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला असून विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे, या पार्श्वभूमीवर नागरिकांना हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

## SPOT NEWS

### मुथूट फायनान्ससह भारतातील ६ फायनान्स कंपन्यांना आर्थिक दंड

**● नवी दिल्ली –** भारतीय रिझर्व्ह बँके म्हणजेच आरबीआयने नियामक नियमांचे पालन न केल्याप्रकरणी मुथूट फायनान्ससह सहा वित्तीय कंपन्यांवर आर्थिक दंड ठोठावला आहे. ग्राहक संरक्षण, जोखीम व्यवस्थापन, केवायसी नियम, कर्ज वितरण आणि नियामक अनुपालनातील त्रुटी आढळल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. आरबीआयने स्पष्ट केले की, हा दंड संबंधित कंपन्यांच्या आर्थिक व्यवहारांच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह नसून केवळ नियामक नियमांचे उल्लंघन झाल्यामुळे करण्यात आलेली प्रशासकीय कारवाई आहे. आरबीआयने मुथूट फायनान्सवर ५.८० लाखांचा दंड ठोठावला आहे. याशिवाय अवेल फायनान्शियल सर्व्हिसेसवर ६.२० लाख, सत्या मायक्रोकॅपिटल आणि पॅन एमामी कॉसमेड या प्रत्येकी कंपनीवर ३.१० लाख, तर धनी लोन्स अँड सर्व्हिसेस आणि मुथूट व्हेईकल अँड ॲसेट फायनान्सवर प्रत्येकी २.७० लाखांचा दंड लावण्यात आला आहे. विविध नियामक नियमांचे उल्लंघन केल्याचे तपासात समोर आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

### तामिळनाडूत ७ अधिकारी निलंबित

**● चेन्नई –** तामिळनाडू सरकारने भ्रष्टाचाराविरोधातील मोहिमेला आणखी गती देत ग्रेटर चेन्नई कॉर्पोरेशन (जीसीसी)च्या सात अधिका-यांना निलंबित केले आहे. या अधिकाऱ्यांविरोधात कथित भ्रष्टाचार आणि उत्पन्नाशी विसंगत आर्थिक व्यवहारांच्या आरोपांप्रकरणी एफआयआरही दाखल करण्यात आला आहे. गेल्या आठवड्यात चेन्नईतील दोन विभागांमध्ये करण्यात आलेल्या अचानक तपासणीनंतर ही कारवाई करण्यात आली. ग्रेटर चेन्नई कॉर्पोरेशनच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, झोन ६ आणि झोन ९ मध्ये ही तपासणी करण्यात आली. उत्तर आणि मध्य चेन्नईतील अनेक महत्त्वाच्या भागांचा या तपासणीत समावेश होता. तपासणीदरम्यान एका सहाय्यक कार्यकारी अभियंत्याला गुगल पे द्वारे झालेल्या २.३९ लाख रुपयांच्या व्यवहारांचे समाधानकारक स्पष्टीकरण देता आले नाही, अशी माहिती एका वरिष्ठ अधिका-याने दिली. तामिळनाडूच्या दक्षता व भ्रष्टाचार प्रतिबंधक संचालनालयाने सादर केलेल्या अहवालाच्या आधारे ही कारवाई करण्यात आली.

## सर्वपक्षीय बैठकीवर बहिष्कार, संसदेचे अधिवेशन वादळी ठरणार

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**
संसदेच्या पावसाळी अधिवेशनापूर्वी केंद्र सरकारने रविवारी बोलावलेल्या सर्वपक्षीय बैठकीत विरोधी पक्षांनी काही काळासाठी प्रतिकात्मक वॉकआऊट करून निषेध नोंदवला. तृणमूल काँग्रेसच्या बंडखोर खासदारांचा समावेश असलेल्या नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी ऑफ इंडिया (एनसीपीआय) या पक्षाला बैठकीचे निमंत्रण दिल्याच्या निर्णयाविरोधात हा निषेध करण्यात आला. दरम्यान, उद्या कॉकरोच जनता पार्टीचा मोर्चा संसदेवर धडकणार असून, फोडाफोडीचे राजकारण, नीट पेपरफुटी, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेण्यास टाळाटाळ, वांगचुक यांचे आंदोलन मोडून काढण्याचा प्रयत्न यासह विविध मुद्द्यावरून अधिवेशन वादळी ठरणार आहे.

काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत सर्व विरोधी पक्षांनी काही मिनिटांसाठी बैठकीतून बाहेर पडत सरकारच्या निर्णयाचा निषेध केल्याचे सांगितले.

## सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचा अहवाल ३ दिवसांत देण्याचा आदेश

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**
गेल्या ३ आठवड्यांपासून बेमुदत उपोषण करत असलेल्या सोनम वांगचुक यांच्या पत्नीने दिल्ली उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका फेटाळण्यात आली. सोनम वांगचुक यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्याची मागणी याचिकेच्या माध्यमातून करण्यात आली होती. न्यायालयाने त्यांना दिलासा देण्यास नकार दिला. वांगचुक यांची ढासळती प्रकृती पाहता त्यांना रुग्णालयात नेण्याचा निर्णय योग्य होता, असे उच्च न्यायालयाने म्हटले.

उपचारांबद्दलचे सगळे वैद्यकीय निर्णय डॉक्टरांचे पथक सोनम वांगचुक यांच्या सहमतीने घेतील, असे दिल्ली उच्च न्यायालयाने स्पष्ट केले. सफदरजंग रुग्णालयात वांगचुक यांच्यावर उपचार सुरू राहतील आणि एम्सचे डॉक्टरदेखील त्यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवतील, असे न्यायालयाने म्हटले आहे. या प्रकरणी केंद्र सरकार, दिल्ली पोलिस आणि रुग्णालय यांच्याकडून उच्च न्यायालयाने ३ दिवसांत अहवाल मागवला आहे. या प्रकरणी पुढील सुनावणी २४ जुलैला होणार आहे.

शरीराची वैद्यकीय स्थिती प्रत्येक वेळी सारखी नसते. त्यामुळे अशा प्रकरणांत न्यायालयाला संपूर्ण घटनाक्रमावर लक्ष ठेवावे लागते. वांगचुक यांची प्रकृती बिघडल्याने सरकारने त्यांना रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय गरज पाहता हा निर्णय योग्य होता, असे न्यायालयाने म्हटले. सोनम वांगचुक कोणत्याही प्रकारच्या अटकेत नाहीत. त्यांच्या कुटुंबियांना रुग्णालयात जाऊन भेटण्याची परवानगी आहे. उपचारा दरम्यान पुढे घेतले जाणारे वैद्यकीय निर्णय डॉक्टरांच्या सहमतीने घेतले जातील, ही बाब न्यायालयाने स्पष्ट केली.

सोनम वांगचुक यांच्या पत्नीच्या वतीने वरिष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी बाजू मांडली. सोनम वांगचुक यांना सफदरजंग रुग्णालयातून खासगी रुग्णालयात हलवण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी सिब्बल यांनी केली. वांगचुक यांना त्यांच्या डॉक्टरांना आणि वकिलांना पूर्णपणे भेटायला मिळत नाही. रुग्णाला त्याच्या गरजेनुसार पसंतीच्या रुग्णालयात उपचार घेण्याचा अधिकार आहे, असा युक्तिवाद सिब्बल यांनी केला. मात्र, न्यायालयाने तो फेटाळून लावला.

# श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराला आकर्षक विद्युत रोषणाई

## मंत्री राधाकृष्ण विखे पाटील । अहिल्यानगर शहर मतदारसंघात सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेचा आढावा

**● पंढरपूर । वीरभूमी –**
आषाढी यात्रेच्या निमित्ताने श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, मंदिर परिसर, श्री संत तुकाराम भवन, श्री विठ्ठल-रुक्मिणी भक्तनिवास तसेच श्री संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप येथे करण्यात आलेल्या आकर्षक विद्युत रोषणाईमुळे संपूर्ण परिसराचे रूप अधिकच देखणे, दिमाखदार व भक्तिमय झाले आहे. आषाढी यात्रेनिमित्त राज्यासह देशभरातून लाखो वारकरी व भाविक श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी पंढरीत दाखल होत आहेत. दिवस-रात्र अखंड सुरू असलेल्या दर्शन व्यवस्थेबरोबरच मंदिर परिसरातील आकर्षक विद्युत सजावट भाविकांचे विशेष आकर्षण ठरत आहे. सूर्यास्तानंतर संपूर्ण परिसर विविधरंगी प्रकाशाने उजळून निघत आहे.

आषाढी यात्रेनिमित्त राज्यासह देशभरातून लाखो वारकरी व भाविक श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी पंढरीत दाखल होत आहेत. दिवस-रात्र अखंड सुरू असलेल्या दर्शन व्यवस्थेबरोबरच मंदिर परिसरातील आकर्षक विद्युत सजावट भाविकांचे विशेष आकर्षण ठरत आहे. सूर्यास्तानंतर संपूर्ण परिसर विविधरंगी प्रकाशाने उजळून निघत आहे. सध्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या जतन व संवर्धनाचे काम प्रगतिपथावर असून, या कामामुळे मंदिराला त्याचे मूळ स्थापत्य वैभव पुन्हा प्राप्त होत आहे. प्राचीन वास्तुशैलीचे सौंदर्य अधिक ठळकपणे समोर येत असतानाच आकर्षक विद्युत रोषणाई मंदिराच्या ऐतिहासिक आणि आध्यात्मिक वैभवात अधिक भर घालत आहे.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या गाभा-यावरील कळसावर करण्यात आलेली सजावट भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेत आहे. कळसदर्शनासाठी येणारे अनेक वारकरी व भाविक या अलौकिक दृश्याचे छायाचित्रण करून या अविस्मरणीय क्षणांची आठवण जतन करत आहेत. सदरची आकर्षक विद्युत रोषणाई मंदिरे समितीमार्फत करण्यात आली असून, संपूर्ण नियोजन व अंमलबजावणीची जबाबदारी विद्युत विभाग प्रमुख राजेश तेलतुंबडे यशस्वीपणे पार पाडत आहेत.

विद्युत रोषणाईसाठी अत्याधुनिक एलईडी माळा, रोप लाईट, आकर्षक लटकन, सजावटीची तोरणे, व्हाईट व वॉर्म फोकस लाईट्स तसेच विविध डेकोरेटिव्ह लाईट आर्टिकल्सचा वापर करण्यात आला आहे.



# SPOT NEWS

## केडगावात अहिल्या शिवणकाम प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने केडगाव येथे 'अहिल्या महिला उद्योजकता विकास' अधिकृत लघुउद्योग शिवणकाम केंद्राचे उद्घाटन उत्साहात पार पडले. याचवेळी आयोजित करण्यात आलेल्या महिला रोजगार मेळाव्यास परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या उपक्रमामुळे महिलांना घरबसल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून, त्यांना प्रशिक्षणासह कायमस्वरूपी उत्पन्नाचा मार्ग खुला होणार आहे. महिला उद्योजकता विकास अभियानांतर्गत सेवाभावी प्रबोधन समिती, कल्याणी महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, रोजगार निर्मिती अभियान आणि संजीवन उद्योग समूह यांच्या संयुक्त विद्यमाने हे केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्राच्या माध्यमातून महिलांना शिवणकामाचे व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात येणार असून, प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना प्रत्यक्ष उत्पादन प्रक्रियेत सहभागी करून १०० टक्के रोजगाराची हमी देण्यात आली असल्याची माहिती आयोजकांनी दिली. या शिवणकाम केंद्रात महिलांकडून विविध आकारांच्या गोधड्या, साध्या व फॅन्सी कुर्त्या, रेशीम कुर्ते, पायजमे तसेच इतर वस्त्रनिर्मिती केली जाणार आहे. उत्पादनासाठी आवश्यक कच्चा माल उपलब्ध करून देण्याबरोबरच तयार मालाची खरेदी संस्थेकडून करण्यात येणार असून, त्याचा मोबदला थेट महिलांना दिला जाणार आहे. त्यामुळे महिलांना बाजारपेठेची चिंता न करता रोजगाराची संधी मिळणार आहे. या उद्घाटन सोहळ्याला नगरसेवक विजय पठारे, उद्योजक संदीप देशमुख, सेवाभावी प्रबोधन समितीचे अध्यक्ष तथा कल्याणी महिला बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा व कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शिका डॉ. सौ. सुनीताताई मोडक, संजीवन उद्योग समूहाचे संदीप फुंदे, कार्यकारी अधिकारी प्रशांत लोणारी, केडगाव शिवणकाम केंद्राच्या अध्यक्षा मोनिका कुसळकर, रविंद्र कुसळकर यांच्यासह परिसरातील अनेक महिला उपस्थित होत्या. प्रास्ताविक उद्योजक संदीप फुंदे यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत मोनिका कुसळकर यांनी केले.

## उडान फाउंडेशनचा १५ ऑगस्टला रंगणार सांस्कृतिक सोहळा

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

उडान फाउंडेशनच्या माध्यमातून १५ ऑगस्ट रोजी शहरातील टिळक रोड येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात ८० व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून सांस्कृतिक व विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये देशभक्तीवर गीते, देशभक्ती गीतांवरील नृत्य स्पर्धा, महाराष्ट्राची लोकधारा सादरीकरण अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचा समावेश आहे. या सोहळ्यात विविध क्षेत्रात सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, पर्यावरण, साहित्य, संस्था, उद्योजक, क्रीडा, योगा आदींमध्ये हिरारीने सातत्याने परिश्रमपूर्वक कार्य करणाऱ्या व्यक्तींना आणि युवकांना राज्यस्तरीय उडान पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते गौरविले जाणार आहे. या पुरस्कारासाठी व्यक्ती परिचय, केलेल्या कार्याची माहिती, फोटो, वर्तमानपत्रातील कार्यक्रमाचे कात्रणे ३० जुलैपर्यंत प्रस्ताव स्वरुपात पाठविण्याचे आवाहन उडान फाउंडेशनच्या अध्यक्षा ॲड. आरती शिंदे यांनी केले आहे. आरती शिंदे, आगडगाव, रतडगाव (ता. अहिल्यानगर) या पत्त्यावर प्रस्ताव पाठविण्याचे म्हंटले आहे. ३० जुलै प्रस्ताव पाठविण्याची शेवटची तारीख आहे. उशीरा आलेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही.

# जनतेच्या प्रत्येक प्रश्नाला न्याय देण्यासाठी प्रयत्नशील

### राहाता येथील जनता दरबारात डॉ. सुजय विखे पाटील यांची ग्वाही । जनतेच्या समस्या थेट ऐकून त्यांचे तातडीने निराकरण

**● राहाता । वीरभूमी –**

जनतेच्या समस्या थेट ऐकून त्यांचे तातडीने निराकरण करण्याच्या उद्देशाने राहाता नगरपालिकेच्या सभागृहात भाजपा प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले. यावेळी राहाता तालुक्यातील व शहरातील नागरिकांनी विविध नागरी सुविधा, विकासकामे तसेच वैयक्तिक व सार्वजनिक स्वरूपाच्या अडीअडचणी निवेदनाद्वारे डॉ. सुजय विखे पाटील यांच्यासमोर मांडल्या.



जनता दरबारात प्रत्येक नागरिकाची समस्या संयमाने ऐकत डॉ. सुजय विखे पाटील यांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांशी प्रत्यक्ष चर्चा केली. तातडीने मार्गी लावता येणाऱ्या प्रश्नांवर तत्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश देतानाच उर्वरित प्रश्नही प्राधान्याने सोडविण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. जनतेच्या प्रत्येक प्रश्नाला न्याय मिळवून देण्यासाठी आपण कायम प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही त्यांनी यावेळी उपस्थित नागरिकांना दिली.

याप्रसंगी राहाता नगरपरिषदेचे नगराध्यक्ष स्वाधीन गाडेकर, उपनगराध्यक्ष, सर्व नगरसेवक, मुख्याधिकारी लोंढे, विविध विभागांचे अधिकारी तसेच भाजपा पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनता दरबारात पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, वीज, नागरी सुविधा, शासकीय योजनांचा लाभ तसेच स्थानिक विकासाशी संबंधित विविध प्रश्न नागरिकांनी मांडले. प्रत्येक निवेदनाची गांभीर्याने दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना वेळेत कार्यवाही करून नागरिकांना दिलासा देण्याच्या सूचना डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिल्या.

नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडीअडचणी जाणून घेण्याचा हा उपक्रम प्रशासन आणि जनतेतील समन्वय अधिक बळकट करणारा ठरल्याची भावना उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली.

## हेमलता गीते यांच्या 'मानवसूक्त' काव्यसंग्रहाला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले काव्य पुरस्कार जाहीर

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

मातृत्व, स्त्रीशक्ती, मानवी संवेदना आणि जीवनमूल्यांचा प्रभावी शब्दाविष्कार करणाऱ्या ज्येष्ठ कवयित्री तथा माजी प्राचार्या हेमलता प्रदीप गीते यांच्या 'मानवसूक्त' या काव्यसंग्रहाला स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने दिला जाणारा 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले काव्य पुरस्कार' जाहीर झाला आहे. साहित्य क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

हा पुरस्कार २५ जुलै रोजी निमगाव वाघा येथे आयोजित 'जगतगुरु संत तुकाराम महाराज राज्यस्तरीय सातवे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन' सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. आषाढी एकादशी आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीचे औचित्य साधून स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने या साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष तथा साहित्य संमेलनाचे संयोजक पै. नाना डोंगरे यांनी दिली.

हेमलता गीते या मराठी साहित्यविश्वातील संवेदनशील आणि अभ्यासू कवयित्री म्हणून ओळखल्या जातात. त्यांच्या 'मातृवृक्ष' या पहिल्या कवितासंग्रहाचे प्रकाशन अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांच्या हस्ते झाले होते. या काव्यसंग्रहाला राज्यस्तरीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. नुकताच प्रकाशित झालेला त्यांचा 'मानवसूक्त' हा दुसरा काव्यसंग्रह साहित्यप्रेमींकडून विशेष दाद मिळवत आहे. या संग्रहात शंभर निवडक कवितांचा समावेश असून, प्रत्येक कवितेत जीवनातील विविध अनुभव, नाती, भावभावना, संघर्ष, संवेदना आणि मूल्यांचा प्रभावी आविष्कार करण्यात आला आहे. मानवी आयुष्याच्या अनेक छटा या कवितांमधून प्रत्ययास येतात. जीवनातील सुख-दुःख, आशा-निराशा, नातेसंबंध, सामाजिक वास्तव आणि सकारात्मक विचार यांचे अत्यंत प्रभावी चित्रण या काव्यसंग्रहात आढळते. आजच्या स्पर्धात्मक आणि तणावग्रस्त जीवनात अपयशामुळे अनेक तरुण नैराश्याकडे व आत्महत्येसारख्या टोकाच्या निर्णयांकडे वळताना दिसतात. अशा युवकांना आत्मविश्वास, जिद्द आणि सकारात्मक जीवनदृष्टी देणाऱ्या प्रेरणादायी कविता 'मानवसूक्त'मध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत. त्यामुळे हा काव्यसंग्रह केवळ साहित्यकृती न राहता समाजाला दिशा देणारा प्रेरणास्रोत ठरत आहे.

## शेतकऱ्याच्या लेकाची गरुडझेप : भावी निमगावच्या साईश चेडेची 'जवाहर नवोदय विद्यालया'त निवड!

**● शेवगाव । वीरभूमी–**

जिद्द, चिकाटी आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर ग्रामीण भागातील मुलेही यशाची उत्तुंग शिखरे पादाक्रांत करू शकतात, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. शेवगाव तालुक्यातील भावी निमगाव येथील एका कष्टकरी शेतकरी कुटुंबातील चि. साईश नवनाथ चेडे या विद्यार्थ्याची 'जवाहर नवोदय विद्यालया'साठी निवड झाली आहे.



■ छाया । अमोल कराळे

या निवडीमुळे साईशला टाकळी ढोकेश्वर येथील नवोदय विद्यालयात इयत्ता १२ वी पर्यंतचे दर्जेदार शिक्षण पूर्णपणे मोफत मिळणार आहे. आपल्या आई-वडिलांच्या अहोरात्र चालणाऱ्या कष्टाची आणि घामाची पूर्ण जाण ठेवून साईशने मिळवलेले हे यश संपूर्ण परिसरासाठी अभिमानास्पद ठरले आहे. साईश सध्या कोकमठाण येथील आत्मा मालिक माध्यमिक व उच्च माध्यमिक गुरुकुल येथे स्पेशल सेमी विभागात इयत्ता ९ वी मध्ये शिक्षण घेत आहे. त्याने इयत्ता ८ वी मध्ये असतानाच या कठीण परीक्षेची परिपूर्ण तयारी सुरू केली होती. शेतात राबणाऱ्या आपल्या आई-वडिलांना सुखद धक्का द्यायचा आणि त्यांच्या कष्टाचे चीज करायचे, याच एका ध्येयाने साईश अभ्यास करत होता. त्याला गुरुकुलमधील सुवर्ण पहाट अभ्यासिका, शंखनाद अभ्यासिका, बारा तास शाळा, स्मार्ट संडे आणि सुपर नाईट अभ्यासिका यांसारख्या नाविन्यपूर्ण व कडक शिस्तीच्या उपक्रमांची मोठी मदत झाली. या सर्व उपक्रमांमध्ये अत्यंत प्रामाणिकपणे सहभाग घेत त्याने हे घवघवीत यश खेचून आणले.

साईश हा सुरुवातीपासूनच अभ्यासात अत्यंत हुशार असून त्याने यापूर्वीही विविध स्पर्धा परीक्षांमध्ये आपले प्राविण्य दाखवले आहे. आई-वडिलांच्या प्रेरणेमुळेच त्याने NMMS परीक्षेत यशस्वी होऊन ४८,००० रुपयांची शिष्यवृत्ती मिळवली, तसेच ८ वी ची शासकीय शिष्यवृत्ती परीक्षा व इतर स्पर्धा परीक्षांमध्येही यश संपादन केले. त्याच्या या यशामागे आत्मा मालिक गुरुकुलचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, प्राचार्य निरंजनजी डांगे, विभागप्रमुख अनिल सोनवणे आणि पर्यवेक्षिका आदमाने यांचे भक्कम पाठबळ लाभले. तसेच त्याला परीक्षेची अचूक तयारी करून घेणारे वर्गशिक्षक सूर्यकांत कऱ्हाळे, विषय शिक्षक वाणी आणि शेळके यांचे अत्यंत मोलाचे मार्गदर्शन लाभले. एका सामान्य कष्टकरी शेतकऱ्याच्या मुलाने परिस्थितीवर मात करत मिळवलेल्या या यशाबद्दल भावी निमगाव परिसर आणि गुरुकुल परिवाराकडून साईश व आजोबा मच्छिंद्र चेडे, वडील नवनाथ चेडे, चुलते जयराम चेडे आदींसह पालकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## अहिल्यानगर जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेचे नूतन

# व्हा.चेअरमन शिवाजीराव कराड यांचा पाथर्डीत भव्य सत्कार

**● पाथर्डी । वीरभूमी–**

अहिल्यानगर जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेच्या नूतन व्हाईस चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल पाथर्डी तालुक्याचे गटशिक्षण अधिकारी शिवाजीराव कराड यांचा तालुक्यातील शिक्षक बांधवांच्या वतीने भव्य सत्कार सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमास शिक्षक, पदाधिकारी, संचालक, माजी पदाधिकारी तसेच विविध शिक्षक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षक बँकेचे माजी व्हाईस चेअरमन गहिनीनाथराव शिरसाठ हे होते, तर महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे राज्यनेते बापूसाहेब तांबे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमात शिक्षक बँकेचे संचालक कल्याणराव लवांडे, माजी व्हाईस चेअरमन ज्ञानेश्वर शिरसाठ, शिक्षक नेते विठ्ठलराव फुंदे, सुभाषराव खेडकर, विजय अकोलकर, शिवाजीराव ढाकणे, रामप्रसाद आव्हाड, राजेंद्र जायभाये, राजेंद्र ढोले, रामदास दहिफळे, प्रशांत शेळके यांच्यासह अनेक शिक्षक नेत्यांनी मनोगत व्यक्त केले. त्यांनी शिक्षक बँकेच्या पारदर्शक कारभाराचे कौतुक करत नूतन व्हाईस चेअरमन कराड यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी शिक्षक बँकेचे माजी चेअरमन नवनाथ तोडमल, गुरुमाऊली मंडळाचे कार्याध्यक्ष बाबा आव्हाड, कापसे सर, राजेंद्र ठोकळ यांच्यासह जिल्ह्यातील विविध पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान तालुक्यात नव्याने रुजू झालेल्या केंद्रप्रमुखांचा सत्कार करण्यात आला. तसेच दोंदे पारितोषिकांचे वितरणही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

प्रमुख पाहुणे बापूसाहेब तांबे यांनी आपल्या मनोगतात शिक्षक बँकेचा कारभार हा सभासदहित केंद्रस्थानी ठेवून, सर्वांना विश्वासात घेऊन पारदर्शकपणे चालविला जाईल, अशी ग्वाही दिली. तसेच नूतन चेअरमन व व्हाईस चेअरमन यांना शुभेच्छा देत आगामी वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन केले.गहिनीनाथ शिरसाठ यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले



■ छाया । अनिल खाटेर

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाळकृष्ण कांठाळी, सूत्रसंचालन आरिफ बेग, अध्यक्षीय सूचना रामदास दहिफळे यांनी मांडली तर भाऊसाहेब ढाकणे यांनी अनुमोदन दिले तर भास्कर दराडे यांनी आभार मानले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

## सोनम वांगचुक यांच्या आंदोलनावरील कारवाईचा अहिल्यानगरमध्ये निषेध

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

लडाखमधील पर्यावरणवादी व सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या दिल्लीतील जंतर–मंतरवरील आंदोलनाबाबत केंद्र सरकारने दडपशाहीची भूमिका घेतल्याचा आरोप करत पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेच्या वतीने अहिल्यानगर शहरातील दिल्ली गेट येथे निषेध आंदोलन करण्यात आले. लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या नागरिकांचा आवाज ऐकण्याऐवजी पोलिसी बळ, प्रशासकीय दडपशाही आणि दुर्लक्षाच्या माध्यमातून आंदोलने मोडून काढण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे देशात अप्रत्यक्षरीत्या आणीबाणीसदृश परिस्थिती निर्माण होत असल्याचा आरोप संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला. या आंदोलनात सोनम वांगचुक यांच्या आंदोलनावरील कथित कारवाईचा निषेध करण्याबरोबरच अहिल्यानगर–पुणे दरम्यान नियमित शटल रेल्वे सेवा तातडीने सुरू करावी आणि नगर अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेचा रद्द करण्यात आलेला परवाना पुन्हा बहाल करून बँक पूर्ववत सुरू करावी, या प्रमुख मागण्यांकडेही शासनाचे लक्ष वेधण्यात आले. या आंदोलनात पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. कारभारी गवळी, शाहीर कान्हू सुंबे, वीर बहादूर प्रजापती, ॲड. अमित थोरात यांच्यासह विविध कार्यकर्ते सहभागी झाले होते. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडे सरकारकडून सातत्याने दुर्लक्ष होत आहे. लोकशाही मार्गाने आंदोलने करून आपले प्रश्न मांडणाऱ्या नागरिकांना दडपण्याचा प्रयत्न करणे ही भूमिका लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांशी विसंगत आहे. संविधानाने प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्तिस्वातंत्र्य, शांततामय आंदोलन आणि शासनापुढे आपल्या मागण्या मांडण्याचा अधिकार दिला आहे.

## शिष्यवृत्ती परीक्षेत श्री समर्थ प्रशालेचे विद्यार्थी गुणवत्ता यादीत चमकले

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल आणि गुणवत्ता यादी नुकतीच जाहीर झाली. या परीक्षेत श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत गुणवत्ता यादीत मानाचे स्थान मिळवले. या यशस्वी विद्यार्थ्यांचे प्रशालेत शालेय समिती चेअरमन ॲड. किशोर देशपांडे, तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी शिक्षक व शिक्षकेतर सहकारी यांनी अभिनंदन व कौतुक केले. याप्रसंगी मुख्याध्यापिका सौ. वसुधा जोशी, पर्यवेक्षक श्री. एल. कुलकर्णी, इयत्ता आठवीचे मार्गदर्शक शिक्षक सौ. शास्त्री मॅडम, श्री. पथवे सर, सौ. मेलगर मॅडम, तसेच इयत्ता पाचवीच्या मार्गदर्शक शिक्षिका सौ. प्रियंका कासार, सौ. चैताली गोरे आणि संकेत शिंदे उपस्थित होते. इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी : ऋषभ नागरगोजे – २६८ गुण (जिल्हा गुणवत्ता यादीत चौथा), आस्था भंडारी – २५६ गुण (१७ वी), प्रांजल बोरकर – २३८ गुण (४९ वी), साईश पालवे – २३६ गुण (५६ वा), श्रीनय कोठुळे – २३० गुण (७८ वा), शेटे – २२६ गुण (९१ वा), अद्वैत धनेश्वर – २१८ गुण (१३२ वा), सुयोग निकम – २१६ गुण, केतकी लुमपाटकी – २१२ गुण (१७८ वी), अदिती जाधव – २०६ गुण (२४४ वी), प्रियांजली पालवे – २०४ गुण (२६२ वी). इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी : स्मित गायकवाड – २६२ गुण (जिल्हा गुणवत्ता यादीत ३० वा), सर्वेश मुटकुळे – २३६ गुण (११० वा), यश घोरपडे – २३६ गुण (११६ वा), सात्विक दातीर – २३४ गुण (१२० वा).

## पठारे मळा येथील वरखेड माता मंदिरातील
# शिलालेखातून उलगडला पारनेरचा मराठाकालीन इतिहास

**शके १६५६ मधील मंदिर व दीपमाळ उभारणीची नोंद । हारबाजी कुळकर्णी यांच्या धार्मिक कार्याचा ऐतिहासिक पुरावा**

**■ विजय उंडे**

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

जिल्ह्यातील पारनेर शहराजवळील पठारे मळा परिसरातील श्री वरखेड माता मंदिराच्या प्रवेशद्वारावर आणि समोरील दीपमाळेवर कोरलेले दोन शिलालेख मराठाकालीन इतिहासाचे महत्त्वपूर्ण पुरावे ठरत आहेत. प्रवेशद्वारावरील शिलालेख उठाव स्वरूपाचा, तर दीपमाळेवरील शिलालेख कोरीव स्वरूपाचा असून दोन्ही देवनागरी लिपीतील मराठी भाषेत आहेत. काळाच्या ओघात अक्षरे पुसट झाल्याने छाप (इम्प्रेशन) घेऊन त्यांचे वाचन करण्यात आले.

**प्रवेशद्वारावरील शिलालेखाचे वाचन :**

१. सके १६५६ आनंद नाव
२. संवछरे श्री चरनी हार
३. बाजी नानाजी जोसी कु
४. ळकर्नी क।। पारनेर ।।छ।।

**दीपमाळेवरील शिलालेखाचे वाचन :**

१. हारबाजी ना
२. नानाजी जोसी
३. कुळकणी क।।
४. पारनेर



■ छाया । विजय उंडे

या दोन्ही शिलालेखांवरून शके १६५६ (इ.स. १७३४–३५) मध्ये मौजे कसबे पारनेर येथील हारबाजी नानाजी जोशी कुळकर्णी यांनी श्री वरखेड माता देवीच्या चरणी मंदिर व दीपमाळ बांधून अर्पण केल्याचे स्पष्ट होते.

हे शिलालेख मराठाकालीन ग्रामीण प्रशासन, धार्मिक आश्रय आणि ग्रामदैवत उपासनेचे महत्त्वपूर्ण पुरावे आहेत. 'कसबे पारनेर' या उल्लेखावरून त्या काळी पारनेर हे प्रशासकीयदृष्ट्या महत्त्वाचे केंद्र होते. तसेच जोशी कुळकर्णी हे गावातील प्रतिष्ठित महसूल व लेखनिक अधिकारी असल्याचे दिसून येते. मंदिर आणि दीपमाळ उभारून त्यांनी धार्मिक परंपरेला दिलेला आश्रय या शिलालेखांतून अधोरेखित होतो. त्यामुळे हे दोन्ही शिलालेख पारनेरच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक वारशाचे मौल्यवान दस्तऐवज मानले जातात.

या शिलालेखांचे संशोधन, माहिती संकलन व वाचन पुणे येथील शिलालेख अभ्यासक अनिल दुधाणे यांनी केले आहे.

## खर्डा ग्रुप ग्रामपंचायतीचे विभाजन तीन नव्या ग्रामपंचायतींची निर्मिती

**विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या पाठपुराव्याला यश!**



**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील खर्डा ग्रुप ग्रामपंचायतीचे विभाजन करून खर्डा, नागोबाचीवाडी आणि पांढरवाडी या तीन स्वतंत्र ग्रामपंचायतींची निर्मिती करण्यात आली आहे. याबाबत ग्रामविकास विभागाची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेनुसार, खर्डा ग्रामपंचायतीमध्ये खर्डा महसुली गाव, नागोबाचीवाडी ग्रामपंचायतीमध्ये नागोबाचीवाडी व मुंगेवाडी महसुली गावे, तर पांढरवाडी ग्रामपंचायतीमध्ये पांढरवाडी व दरडवाडी महसुली गावांचा समावेश राहणार आहे. ही अधिसूचना १७ जुलै २०२६ पासून लागू करण्यात आली आहे.

ग्रामस्थांची अनेक दिवसांपासूनची मागणी लक्षात घेऊन हा विषय मार्गी लावण्यासाठी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी ग्रामविकास विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या या प्रयत्नांना आता यश आले आहे.

या निर्णयामुळे संबंधित ग्रामपंचायतींच्या प्रशासकीय कामकाजास अधिक सुलभता येण्यास मदत होणार आहे. स्थानिक नागरिकांना अधिक चांगल्या नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत, अशी ग्वाही विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिली.

## पाटोदा येथे आयशर-हुंडाई वेन्यूची समोरासमोर धडक; दोन शासकीय कर्मचाऱ्यांचा जागीच मृत्यू

**श्रीगोंदा तहसील कार्यालयातील कर्तव्यदक्ष कर्मचाऱ्याचा मृत्यू**

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

जामखेड–माहीजळगाव राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८–डीवरील पाटोदा परिसरात रविवारी पहाटे आयशर ट्रक आणि हुंडाई वेन्यू कार यांच्यात समोरासमोर भीषण धडक होऊन दोन शासकीय कर्मचाऱ्यांचा जागीच मृत्यू झाला. या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, महामार्गावरील सुरू असलेल्या दुरुस्तीच्या कामावर आणि वाहतूक व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, आयशर (एमएच–१४ बीजे–२२८३) आणि हुंडाई वेन्यू (एमएच–२० जीई–३५६२) यांच्यात पाटोदा परिसरात समोरासमोर जोरदार धडक झाली. या भीषण अपघातात श्रीगोंदा तहसील कार्यालयातील कर्तव्यदक्ष महसूल सहाय्यक विकील बहुरे आणि कुकडी पाटबंधारे उपविभाग, करमाळा येथील मोजणीदार रामचंद्र बहुरे यांचा जागीच मृत्यू झाला.

स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, पाटोदा–रत्नापूर दरम्यान महामार्गावर मोठ्या भेगा पडल्यामुळे दुरुस्तीचे काम सुरू आहे. या कामासाठी एका बाजूची वाहतूक बंद करून केवळ एका लेनवरून दोन्ही बाजूंची वाहतूक सुरू होती. याच ठिकाणी समोरून येणाऱ्या आयशर आणि कारची जोरदार धडक होऊन हा अपघात घडल्याचे सांगण्यात आले.

अपघाताची माहिती मिळताच १०८ रुग्णवाहिका आणि जामखेड पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जखमींना ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर दोघांनाही मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळाल्यानंतर जामखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. अपघाताचा पुढील तपास पोलीस नाईक प्रवीण इंगळे करीत आहेत.

दरम्यान, या महामार्गाचे काम अनेक वर्षांपासून संथगतीने सुरू असून, नव्याने तयार झालेल्या रस्त्यावरही मोठमोठ्या भेगा पडल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. दुरुस्तीच्या नावाखाली अनेक ठिकाणी एकेरी वाहतूक सुरू असल्याने वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. यापूर्वीही या मार्गावर अनेक अपघात घडल्याचे नागरिकांनी सांगितले.

या दुर्घटनेनंतर संबंधित कंत्राटदाराच्या कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, दुरुस्तीची कामे सुरक्षित पद्धतीने पूर्ण करून वाहनचालकांच्या सुरक्षेसाठी तातडीने उपाययोजना कराव्यात तसेच निष्काळजीपणा करणाऱ्या संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# राहुरीतील पाणीटंचाई दूर करण्यासाठी वांबोरी चारीसाठी ५७ कोटींचा निधी

**पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील । पाणीटंचाई, मतदार पुनरिक्षण आणि खत उपलब्धतेबाबत आढावा बैठक**

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

राहुरी शहर व तालुक्यातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी जलसंपदा विभागामार्फत वांबोरी चारी टप्पा–१ साठी १७ कोटी रुपये आणि टप्पा–२ साठी ४० कोटी रुपये, असा एकूण ५७ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देत नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्यासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करावे, असे निर्देश जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

राहुरी विधानसभा मतदारसंघातील विशेष सखोल मतदार पुनरिक्षण मोहीम आणि तालुक्यातील पाणीटंचाईच्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस आमदार अक्षय कर्डिले, आमदार प्राजक्त तनपुरे, उपविभागीय अधिकारी किरण सावंत पाटील, अनुप यादव, प्रसाद मते तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी विशेष सखोल मतदार पुनरिक्षण मोहिमेच्या प्रगतीचा आढावा घेत प्रक्रिया पारदर्शक, अचूक व विहित मुदतीत पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने लोकप्रतिनिधींसमवेत समन्वयाने काम करावे, असे निर्देश दिले.

बैठकीत तालुक्यातील पाणीपुरवठ्याची सद्यस्थिती, उपलब्ध पाणीसाठा, सुरू असलेले टँकर आणि नागरिकांसमोरील अडचणींचा आढावा घेण्यात आला. पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देत टंचाई निवारणाच्या उपाययोजना प्रभावीपणे राबवाव्यात तसेच नागरिकांना कोणतीही अडचण भासणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सांगितले.

शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या युरिया खताच्या टंचाईची दखल घेत संबंधित विभागांनी खताचा पुरेसा पुरवठा सुनिश्चित करावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. तसेच वांबोरी चारीच्या दोन्ही टप्प्यांतील कामांना गती देण्याचे निर्देश दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासन शेतकरी, नागरिक आणि ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देत आहे. शासनाच्या विविध जनहिताच्या योजनांचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी प्रशासनाने लोकप्रतिनिधींसमवेत समन्वयाने व संवेदनशीलतेने काम करावे, असे आवाहनही डॉ. विखे पाटील यांनी केले.



# जादा दराने खतविक्री करणाऱ्यांना पाठीशी घालणार नाही

## पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील । संगमनेर तालुक्यातील खरीप हंगाम व टंचाई आढावा बैठक

**● शिर्डी । वीरभूमी –**
पुराव्यांसह लेखी तक्रारी आल्यास कोणालाही पाठीशी न घालता जादा दराने खतांची विक्री करणाऱ्या दुकानांवर तातडीने कारवाई करण्याचे निर्देश जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले. साकूरच्या उपसा सिंचन योजना व भोजापूर चारीच्या कामासाठी निधीच्या प्रस्तावास तातडीने मंजुरी देणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

संगमनेर तालुक्यातील खरीप हंगाम व टंचाई आढावा बैठकीत ते बोलत होते. याप्रसंगी आमदार अमोल खताळ, प्रांताधिकारी अरुण उंडे, उपविभागीय कृषी अधिकारी अक्षय गोसावी, तहसीलदार धीरज मांजरे, वीज वितरण कंपनीचे प्रदीप वट्टमवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे श्रीनिवास वर्पे, जलसंपदा विभागाचे प्रदीप हापसे, अमोल कवडे, जलसंधारण विभागाचे अभियंता गायसमुद्रे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

तालुक्यातील जलजीवन योजनेच्या कार्यपद्धतीबाबत मोठ्या प्रमाणात प्राप्त तक्रारींवर श्री. विखे पाटील म्हणाले की, योजनेच्या कामावर लोकांचा विश्वास राहिलेला नाही. ज्या गावांत मोठ्या प्रमाणात तक्रारी आल्या आहेत, तेथे विभागाचे व स्वतंत्र यंत्रणेतील अधिकारी पाठवून कामाचे परीक्षण करून अहवाल सादर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

जलजीवन योजनेच्या कामात अनेक गावांत योजनेचे पाईप न टाकताच बिले काढण्यात आल्याची बाब अतिशय गंभीर असून, घुलेवाडी गावच्या पाणीपुरवठा योजनेबाबतही ग्रामस्थांनी बैठकीत मंत्री विखे पाटील यांच्याकडे मोठ्या प्रमाणात तक्रारी केल्या.

तालुका कृषी अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे तालुक्यातील शेतकरी विमा योजनेपासून वंचित राहिले. त्यांच्या कार्यपद्धतीत सुधारणा करण्याबाबत उपविभागीय कृषी अधिकारी अक्षय गोसावी यांनी गांभीर्याने दखल घ्यावी, असे निर्देश मंत्री विखे पाटील यांनी दिले. तालुक्यात खतांचे लिंकिंग होत असल्यास शेतकऱ्यांकडून पुराव्यांसह लेखी तक्रारी मागवून घ्याव्यात. कोणालाही पाठीशी न घालता जादा दराने खतांची विक्री करणाऱ्या दुकानदारांवर कारवाई करण्याचेही त्यांनी सांगितले.

जलसंपदा विभागाच्या माध्यमातून पाण्याचे चांगले नियोजन झाल्यामुळे निळवंडे व प्रवरा लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना पाण्याची समस्या जाणवली नाही. निळवंडे धरणातून आठ आवर्तने सोडून २४० बंधारे भरले आहेत. साकूर भागातील पाणीप्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी उपसा सिंचन योजनेच्या सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले असून, या योजनेच्या कामाचा सुमारे १०० कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येणार आहे. भोजापूर प्रकल्पाचा वैतरणा-गोदावरी नदीजोड प्रकल्पात समावेश करण्यात आला असून, या योजनेतूनच निधी उपलब्ध होणार आहे. शासनाने दिलेला शब्द आम्ही पाळणार, अशी ग्वाहीही श्री.विखे पाटील यांनी दिली.

आमदार अमोल खताळ म्हणाले, पूर्वीपेक्षा आता ग्रामीण व शहरी भागात विकासकामे मार्गी लागण्याचे प्रमाण वाढले आहे. अधिकाऱ्यांचेही चांगले सहकार्य मिळत असल्याने शासनाच्या माध्यमातून विविध कामे होत आहेत. ज्या गावांत पाण्याची टंचाई आहे,




त्या ठिकाणी टँकर उपलब्ध करून देण्यासाठी आपण सूचना देत असतो. गावातील कार्यकर्त्यांनीही विकासकामे व स्थानिक समस्यांबाबत जागरूक राहिले पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

पालकमंत्री विखे पाटील व आ. अमोल खताळ यांच्या प्रयत्नांमुळे तालुक्यात १३ हजार घरकुलांना मंजुरी मिळाल्याची माहिती गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे यांनी दिली. योजनेच्या लाभार्थ्यांसाठी टोल फ्री क्रमांकाची सुविधा सुरू करण्यात आली असून, त्याचे विमोचनही करण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली शासनाने सुमारे ३६ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी व सुमारे ४८ हजार कोटी रुपयांचे शेतकऱ्यांचे वीजबिल माफ करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. शासनाच्या या निर्णयाची माहिती गावोगावी पोहोचवावी, असे आवाहन त्यांनी केले.

# खडकवाडीत ‘सुप्रभा कृषी सेवा केंद्रा’कडून टंचाईच्या काळात युरियाचे सुरळीत वाटपाने शेतकऱ्यांना दिलासा

**● पारनेर । वीरभूमी–**
सध्या सुरू असलेल्या खरीप हंगामात बाजरी, सोयाबीन यांसारख्या प्रमुख पिकांची जोपासना करण्यासाठी खतांची, विशेषतः युरियाची प्रचंड आवश्यकता आहे. मात्र, मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी असल्याने परिसरातील बाजारपेठांमध्ये युरियाची मोठी टंचाई निर्माण झाली आहे. अशा कठीण आणि संकटाच्या काळात खडकवाडी येथील ‘सुप्रभा कृषी सेवा केंद्रा’ने पुढाकार घेत सामाजिक बांधिलकी जपली आहे. केंद्राचे संचालक आणि सामाजिक कार्यकर्ते राहुल आहेर यांनी अत्यंत पारदर्शक आणि शिस्तबद्ध पद्धतीने शेतकऱ्यांना युरिया खताचे वाटप करून त्यांना मोठा दिलासा दिला आहे.खरीप हंगामाच्या या महत्त्वाच्या टप्प्यावर पिकांना खतांची गरज असताना, अनेक ठिकाणी युरियाचा तुटवडा भासत होता. त्यामुळे शेतकरी चिंतेत होते. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून राहुलशेठ आहेर यांनी तातडीने नियोजन केले. आपल्या कृषी सेवा केंद्राच्या माध्यमातून त्यांनी युरियाची उपलब्धता सुनिश्चित केली आणि कोणताही काळाबाजार होऊ न देता, शेतकऱ्यांना रास्त दरात युरिया उपलब्ध करून दिला. त्यांच्या या निर्णयामुळे ऐन टंचाईच्या काळात शेतकऱ्यांची धावपळ थांबली असून पिकांच्या वाढीसाठी लागणारे महत्त्वाचे पोषण त्यांना वेळेत मिळाले आहे.

> सध्या खतांची मोठी टंचाई असताना राहुल आहेर यांनी कोणत्याही प्रकारची नफेखोरी न करता उलट शेतकऱ्यांना वेळेत आणि रास्त दरात खत उपलब्ध करून दिले आहे. हि खरोखरच कौतुकास्पद आणि इतरांसाठी आदर्श घेण्यासारखी बाब आहे.
> – **राजू रोकडे**, प्रवक्ते, भूमिपुत्र शेतकरी संघटना.

युरियाच्या वाटपासाठी राहुलशेठ यांनी राबवलेली पद्धत अत्यंत पारदर्शक होती. खताची साठेबाजी टाळण्यासाठी आणि गरजू शेतकऱ्यांपर्यंत खत पोहोचवण्यासाठी त्यांनी विशेष लक्ष दिले. त्यांच्या या नियोजनामुळे केवळ खडकवाडीच नव्हे, तर परिसरातील अनेक गावांतील शेतकऱ्यांना याचा फायदा झाला आहे. खत मिळवण्यासाठी होणारी गर्दी आणि रांगा पाहता, राहुल आहेर यांनी राबवलेली यंत्रणा शेतकऱ्यांच्या सोयीची ठरली.त्यांच्या या कृतीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे. केवळ व्यापारी दृष्टिकोन न ठेवता, शेतकरी हिताला प्राधान्य दिल्याबद्दल त्यांचे विशेष कौतुक केले जात आहे. अशा प्रकारे, एका कृषी सेवा केंद्राच्या जागरूकतेमुळे आणि सामाजिक जबाबदारीच्या भावनेमुळे खडकवाडी परिसरातील शेतकऱ्यांची चिंता दूर झाली आहे.

# कोपरगावात भगवान श्री जगन्नाथ रथयात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## आ. विवेक कोल्हे यांची उपस्थिती । इस्कॉनच्या संस्कार, अध्यात्म व सामाजिक कार्याचे कौतुक

**● कोपरगाव । वीरभूमी–**
इस्कॉन कोपरगावच्या वतीने आयोजित भगवान श्री जगन्नाथ रथयात्रेचे शहरात भक्तिमय वातावरणात उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. यावेळी आमदार विवेक कोल्हे यांनी भगवान श्री जगन्नाथांचे दर्शन घेऊन रथयात्रेस शुभेच्छा दिल्या. तसेच इस्कॉन संस्थेच्या माध्यमातून समाजात सुरू असलेल्या आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्याचे त्यांनी कौतुक केले.


■ छाया । जनार्दन जगताप

यावेळी बोलताना आमदार विवेक कोल्हे म्हणाले की, इस्कॉन ही संस्था केवळ धार्मिक कार्यापुरती मर्यादित नसून युवा पिढीला संस्कार, शिस्त, नैतिक मूल्ये आणि अध्यात्माची दिशा देण्याचे मोलाचे कार्य करत आहे. धकाधकीच्या जीवनात तरुणांना सकारात्मक विचार, व्यसनमुक्त जीवनशैली आणि भारतीय संस्कृतीशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य इस्कॉनच्या माध्यमातून होत असल्याचे त्यांनी सांगितले. समाजात शांतता, बंधुभाव आणि मानवतेचा संदेश देणाऱ्या या कार्यात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

रथयात्रेच्या स्वागतासाठी शहरात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. स्वच्छ आणि सुंदर वातावरणात भगवान श्री जगन्नाथ यांच्या रथाचे भाविकांनी मोठ्या श्रद्धेने स्वागत केले. आमदार विवेक कोल्हे यांनीही भगवान श्री जगन्नाथांचे दर्शन घेऊन सर्व नागरिकांच्या सुख, समृद्धी आणि उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना केली.

यावेळी इस्कॉनचे महंत व पदाधिकारी, नगराध्यक्ष पराग संधान, मच्छिंद्र केकान, विजयराव आढाव, राजेंद्र सोनवणे, प्रशांत कडू, विनोद राक्षे, बाळासाहेब नरोडे, प्रसाद आढाव, कैलास मंजुळ, संतोष चवंडके, स्वप्निल मंजुळ, सरपंच संदीप देवकर, डॉ. अमोल अजमेरे, संजय उदावंत, दत्तू पगारे, रोहित कनगरे, स्वराज सूर्यवंशी, अर्जुन माकोने, शैलेश नागरे, आयुब कच्छी आदींसह स्वयंसेवक, भाविक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हरिनाम संकीर्तन, जयघोष आणि भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या रथयात्रेमुळे कोपरगाव शहर आध्यात्मिक उत्साहाने भारावून गेले. इस्कॉनच्या या उपक्रमामुळे समाजात अध्यात्म, सेवा आणि संस्कारांची प्रेरणा अधिक दृढ होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# पाडोशी परिसरातील ३०० विद्यार्थ्यांना स्कूल किटचे वाटप

## पुणे येथील डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम शैक्षणिक सहाय्यता ग्रुपचा स्तुत्य उपक्रम

**● अकोले । वीरभूमी–**
अकोले तालुक्यातील ग्रामीण, दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला बळ देण्याच्या उद्देशाने डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम शैक्षणिक सहाय्यता ग्रुप, पुणे यांच्या वतीने पाडोशी केंद्रातील विविध पंधरा जिल्हा परिषद शाळांमधील सुमारे ३०० विद्यार्थ्यांना स्कूल किटचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध झाल्याने पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

या उपक्रमांतर्गत पाडोशी, पेढेवाडी, शेरेवाडी, कोकणवाडी, पाचपट्टा, पांगवाडी, पट्टेवाडी, पिंपळदरावाडी, रामवाडी, शिवाजीनगर, सोमठाणे, वाकी, धारवाडी व गंभीरेवाडी येथील जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांना दप्तर, वह्या, पेन, पेन्सिल, चित्रकला वही रंगसाहित्य तसेच इतर आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमासाठी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम शैक्षणिक सहाय्यता ग्रुप, पुणे यांच्या वतीने उद्धवराज टेमकर, सुप्रिया टेमकर, शिवदेव माचवे, माया माचवे, विद्या गुंड, धनराज गुंड, अजय पासलकर, प्रियंका पासलकर, शिवकल्याण चव्हाण, भालचंद्र धुमाळ, महेश कुलकर्णी, शुभांगी कुलकर्णी, राजेश उदमले, सचिन म्हस्के, कामिनी म्हस्के, यश बोठे, वैशाली भांड, महेश शिंदे व अर्चना शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमात संस्थेचे प्रतिनिधी उद्धवराज टेमकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत, शिक्षण हीच सर्वात मोठी संपत्ती असून गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आवश्यक साहित्य प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचावे, अशी भावना व्यक्त केली. उपस्थित शिक्षकांनीही या उपक्रमाबद्दल संस्थेप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

या शैक्षणिक उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला असून, त्यांच्या शिक्षणाचा प्रवास अधिक सुकर व प्रेरणादायी होण्यास निश्चितच मदत होणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

जिल्हा परिषदेच्या पेढेवाडी शाळेत झालेल्या मुख्य वाटप कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयवंत बोंबले यांनी सूत्रसंचालन किरण शिरोळे यांनी तर सुभाष जोंधळे यांनी आभार मानले.


■ छाया । विद्याचंद्र सातपुते

तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी डॉ. बाळासाहेब दोरगे यांनी संस्थेच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली. संस्थेच्या सदस्यांचे अभिनंदन करत सामाजिक कार्यास शुभेच्छा दिल्या. ज्ञानदीप प्रतिष्ठानचे अध्यक्ष भाऊसाहेब कासार यांनी समन्वय करत स्कूल किट विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावेत यासाठी विशेष प्रयत्न केले.

या कार्यक्रमासाठी सुरेखा फापाळे, केंद्रप्रमुख पंढरीनाथ वाघुर्डे, लक्ष्मण मेमाणे, नवनाथ हंबर्डे, अरुण गाढे, सुरेश पिचड, बहिरू साबळे, सुनंदा खताळ, सुवर्णा जाधव, वंदना तळपाडे तसेच पेढेवाडीचे सरपंच भागवत गातवे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बाळू शिरसाट, सीताराम बोऱ्हाडे गुरुजी, सोमनाथ गोडे व सुदाम धिंदळे अरुण कोटकर, अजय कचरे यांच्या सह केंद्रातील शिक्षकांनी मोलाचे सहकार्य केले.